झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा / सप्रा-१/कोंढवा/२०६८ /२०२३
दिनांक :२३/१०/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

(२) ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद कोंढवा खुर्द, स.नं.४/अ/१ब/१अ, ४/अ/१ब/२, ४अ/१४ब/२, सि.स.नं.३९३/४ येथील झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रावर क्षेत्रफळ ८४६.५० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

(४) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.प्रायमार्क डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे; आणि

(५) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र खाजगी मालकीचे असून या क्षेत्राचे मालकी हक्क / विकसन हक्क झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नेमलेल्या विकसकाने प्राप्त केले आहेत; आणि

(६) ज्याअर्थी, तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१,पुरवणी, पृष्ठ क्र.२४१०, दि.०९/११/२००० रोजी प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले असलेबाबतचा दाखला सहाय्यक अभियंता, उपायुक्त क्र.४, पुणे महानगरपालिका, पुणे यांना दिलेला आहे; आणि

(७) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१-२७ सप्टेंबर, २०२३ पान क्र.९, १० वर, तसेच दैनिक महाराष्ट्र टाईम्स् व महाराष्ट निरोप्या या वर्तमानपत्रामध्ये दि.१७/०९/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजना क्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर दि.१५/०९/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(८) ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था तसेच सदर क्षेत्राबाबत इतर संबंधितांना प्रत्यक्ष सुनावणीची संधी देण्यात आली असुन कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे सादर झाले नाहीत; आणि

(९) ज्याअर्थी, उपरोक्त खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>अनुसूची</u>

**<u>झोपडपट्टीचे नाव</u> :** स.नं.४/अ/१ब/१अ, ४/अ/१ब/२, ४अ/१४ब/२, सि.स.नं.३९३/४, कोंढवा खुर्द, पुणे
**<u>महानगरपालिका क्षेत्र</u> : पुणे महानगरपालिका**

| गाव | स.नं. | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र ( चौ. मी.) | वाढ / घट | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोंढवा खुर्द | स.नं.४/अ/१ब/१ अ, ४/अ/१ब/२, ४अ/१४ब/२, सि.स.नं.३९३/४, कोंढवा खुर्द, पुणे | ८४६.५० चौ. मी. (झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र) | - | ८४६.५० चौ. मी. (झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र) | खाजगी - मे.प्रायमार्क डेव्हलपर्स तर्फे श्री.मालव जयंत शहा | **पुर्वेस** - लागु हि.क्र.१२<br>**पश्चिमेस** - लागु स.नं.४ ब व लागु हि.क्र. १५<br>**दक्षिणेस** - जागेवरील रस्ता<br>**उत्तरेस** - लागु रस्ता वानवडी शीव | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** / /२०२३

**(नीलेश गटणे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

19.10.23

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, पुणे -०१ यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती
४. जमिन मालक - मे.प्रायमार्क डेव्हलपर्स तर्फे श्री.मालव जयंत शहा यांना माहितीस्तव.